# नियमित दिवाणी दावा क्र. ८४/२०१२
## निशाणी १४९ वरील आदेश
## (धनाजी भाऊसोा कदम वि. सुरेश भाऊसोा कदम)

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा दावा मिळकतीचे वाटप होऊन मिळणेकरिता दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये दि. ०४/११/२००६ रोजीच्या खरेदीपत्राच्या अनुषंगाने दुरुस्ती करणेत आलेली होती. दुरुस्त दावा प्रत दाखल करताना नजरचुकीने खरेदीपत्राची तारीख दि. ०४/११/२००६ ऐवजी दि. २१/०३/२०१७ अशी नमुद झाली आहे. दि. २१/०३/२०१७ रोजीचे कोणतेही खरेदीपत्र नसून त्याबाबत वादीचा कोणताही दावा नाही. म्हणून दाव्यामध्ये खरेदीपत्राची तारीख दि. २१/०३/२०१७ ऐवजी दि. ०४/११/२००६ अशी दुरुस्ती करणेची परवानगी मिळावी अशी वादीने विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १६ तर्फे नि. १५१ येथे म्हणणे दाखल करण्यात आले आहे. प्रतिवादीचे असे कथन आहे की, वादीने निशाणी ८४ येथे दावा दुरुस्तीचा अर्ज देताना त्या अर्जात देखील दि. २१/०३/२०१७ अशी तारीख नमूद केली होती. त्यानुसार दाव्यामध्ये दि. २१/०३/२०१७ रोजीचे खरेदीपत्र असा उल्लेख करण्यात आला आहे. दि. २१/०३/२०१७ रोजीच्या खरेदीपत्राबाबत मुद्दा देखील काढण्यात आला आहे. वादीस अंतिम युक्तीवादावेळी पुन्हा दावा दुरुस्ती करिता अर्ज देण्याचा अधिकार नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी प्रतिवादी क्र. १६ याने विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्या कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ असुन त्यांचे निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी मागत असलेली दुरुस्ती करुन मिळण्यास पात्र आहे काय? | होकारार्थी |
| २. | काय आदेश? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

मुद्दे क्र.१ व २ करीता –

५. वादी व प्रतिवादीतर्फे युक्तीवाद ऐकला.

६. प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. १६ ने निशाणी ६६ येथे अर्ज दाखल केला होता की, दि. ०४/११/२००६ रोजीच्या खरेदीपत्राने दावा मिळकतीतील हिस्सा त्याने खरेदी घेतला आहे. निशाणी ६६ वरील आदेशान्वये प्रतिवादी क्र. १६ यास दाव्यात समाविष्ट करण्यात आले. त्यानंतर निशाणी ८४ येथे वादीने अर्ज दाखल करुन दाव्यामध्ये दि. ०४/११/२००६ रोजीच्या खरेदीपत्राबाबत दुरुस्ती मागितली. वादीने दि. ०४/११/२००६ रोजीचे खरेदीपत्र आव्हानीत केले आहे. निशाणी ८४ वरील अर्जात परिच्छेद क्र. १ मध्ये वादीने खरेदीपत्राची तारीख दि. ०४/११/२००६ व परिच्छेद क्र. २ मध्ये खरेदीपत्राची तारीख दि. २१/०३/२०१७ अशी नमुद केली आहे. निशाणी ८४ वरील अर्ज मंजूर झाल्यानंतर वादीने दाव्याची दुरुस्त प्रत दाखल केली आहे. दाव्याच्या दुरुस्त प्रतीत खरेदीपत्राची तारीख दि. २१/०३/२०१७ अशी नमुद आहे. प्रस्तुत अर्जात वादीचे असे कथन आहे की, दि.

२१/०३/२०१७ ही तारीख चूकीने नमूद झाली आहे. संपूर्ण दाव्याचे व प्रतिवादी क्र. १६ च्या कथनांचे अवलोकन करता दि. ०४/११/२००६ रोजीच्या खरेदीपत्रानेच प्रतिवादीस दावा मिळकतीत हक्क प्राप्त झाला असे प्रतिवादीचे कथन आहे. प्रतिवादी क्र. १६ याने दाखल केलेले खरेदीपत्र हे देखील दि. ०४/११/२००६ रोजीचे आहे. दि. २१/०३/२०१७ रोजीचे खरेदीपत्र प्रस्तुत दाव्यात अस्तित्वात नाही. त्यामुळे निश्चितपणे चूकीने दि. २१/०३/२०१७ ही तारीख दाव्यात नमूद झाली असे दिसून येते. त्यामुळे वादी मागत असलेली दुरुस्ती होऊन मिळण्यास पात्र आहे. परंतू प्रस्तुतचा अर्ज अंतिम युक्तीवादावेळी दाखल केला असल्याने झालेल्या विलंबाकरीता द्रव्यदंड देण्यासाठी वादी पात्र आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादीने प्रतिवादी क्र. १६ यांना र. रु. १०००/- द्रव्यदंड द्यावा.

३. वादीने प्रस्तुत आदेशापासुन १४ दिवसांचे आत दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करावी.

कडेगांव
दिनांक : ३०/०३/२०२२

सही/-
(प्राजक्ता रा. सबनीस)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव